**ठळक बातम्या**

- भारत आणि बेल्जिअम यांच्यात विविध क्षेत्रांमधे सामंजस्य करार

- महिला बचत गटांना बँकांकडून कर्ज घेताना येणाऱ्या अडचणी दूर करण्याचं केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंग चौहान यांचं आश्वासन

- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते सावंतवाडी रोड स्थानकादरम्यानची नवीन एक्सप्रेस गाडी रवाना

**आणि**

- भारताचा किदांबी श्रीकांत चायना मास्टर्स सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत दाखल

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि बेल्जियमचे प्रधानमंत्री बार्ट डी वेव्हर यांच्यात आज नवी दिल्ली इथं द्विपक्षीय चर्चा झाली. दोन्ही नेत्यांनी यावेळी द्विपक्षीय संबंधांच्या विविध पैलूंवर, तसंच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा केली. यावेळी विविध क्षेत्रांमधल्या सामंजस्य करारांवर स्वाक्षरी झाली. संरक्षण सहकार्याबाबत इरादापत्र, तसंच नवीकरणीय ऊर्जा, सायबर गुन्हेगारी आणि राजनैतिक प्रशिक्षण या क्षेत्रांमधल्या सामंजस्य करारांचा यात समावेश आहे.

भारत-बेल्जियम संबंधांचं मूळ इतिहासात खोलवर रुजलं असून, सामायिक लोकशाही मूल्यं, बाजारपेठआधारित अर्थव्यवस्था आणि परस्परांच्या जनतेमधले संबंध भारत आणि बेल्जियम यांना नैसर्गिक भागीदार बनवतात. असं प्रधानमंत्री मोदी यावेळी म्हणाले.

जागतिक अस्थिरतेच्या काळात आज अन्न, इंधन आणि पुरवठा साखळ्या यासारखी अनेक क्षेत्र प्रभावित झाली आहेत. या आव्हानात्मक परिस्थितीतही भारताच्या अर्थव्यवस्थेनं आपली गती कायम राखल्याचं त्यांनी नमूद केलं. भारताची विकास गाथा जगासाठी आत्मविश्वास आणि नवीन संधींचे स्रोत बनत असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

महिला बचत गटांना बँकांकडून कर्ज घेताना येणाऱ्या अडचणी दूर करण्याचं आश्वासन केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी दिलं आहे. मुंबईत महिला बचत गटांच्या सदस्यांसोबत चर्चा केल्यानंतर ते बोलत होते.

देशात ६ कोटी लखपती दीदी बनवण्याचं केंद्र सरकारचं उद्दिष्ट आहे. त्यातल्या साडे ३ कोटी पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित लखपती दीदींचे लक्ष्य पूर्ण करण्यात येणारे अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

एका वीजनिर्मिती कंपनीशी संबंधित २९० कोटी रुपयांच्या बँक फसवणुकीच्या प्रकरणात ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयानं कोलकाता इथं ११ ठिकाणी छापे टाकले. झारखंडमध्ये ६६ मेगावॅटचा वीजप्रकल्प उभारण्यासाठी संबंधित कंपनीनं बँकांकडून कर्ज घेतलं होतं. मात्र, ही रक्कम कंपनीनं आपल्या समूहातल्या इतर कंपन्यांकडे वळवली आणि वैयक्तिक कारणांसाठी वापरली, असा आरोप ईडीने केला आहे. राष्ट्रीय कंपनी कायदे लवादासमोर या कंपनीची दिवाळखोरी सिद्ध झाल्यानंतर तिचं अवसायन झालं. या प्रक्रियेत फक्त सात कोटींची वसुली झाली. उर्वरित रकमेच्या वसुलीसाठी हे छापे टाकण्यात आले आहेत.

दरम्यान, ईडीने अंमली पदार्थांशी संबंधित विविध प्रकरणांच्या संदर्भात केरळ, कर्नाटक, तमिळनाडू आणि तेलंगणा या राज्यांमधल्या ३० ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले आहेत. नशामुक्त भारत मोहिमेअंतर्गत ही कारवाई होत आहे.

<><><><><>

मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि कोकणात सावंतवाडी रोड स्थानकादरम्यान धावणाऱ्या नवीन एक्सप्रेस गाडीला रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज दूरस्थ पद्धतीनं हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं.

ही विशेष गाडी दुपारी १२ वाजून ५० मिनिटांनी सीएसएमटी इथून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे २ वाजता सावंतवाडी रोड इथं पोहोचेल. ही गाडी दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी,

आडवली, वळिवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग आणि कुडाळ या ठिकाणी  थांबा घेईल.

गणेशोत्सव काळात प्रवाशांच्या सोयीसाठी यंदा साडे-तीनशे विशेष गाड्या चालवल्या जातील, तसंच आवश्यकतेनुसार जादा गाड्यांची व्यवस्था केली जाईल, असं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यावेळी सांगितलं.

राज्यातल्या प्रस्तावित पूर्व-पश्चिम समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरबद्दलही त्यांनी माहिती दिली. हा कॉरिडॉर विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातल्या अशा भागांना जोडेल, जिथे पूर्वी रेल्वे जोडणी नव्हती, असं ते म्हणाले. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचं काम प्रगतीपथावर असून, या सेवेचा पहिला टप्पा २०२७ मध्ये सुरु करण्याचं उद्दिष्ट असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी मराठा संघटनांनी राज्यात विविध जिल्ह्यांमधे आज बंद पुकारला आहे. नांदेड जिल्ह्यात नांदेड-नागपूर महामार्गावर मराठा आंदोलकांनी रास्ता रोको केल्यामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली. बीड शहरातले व्यापारीही या आंदोलनात सहभागी झाले आहेत. परभणी जिल्ह्यातही बंदची हाक देण्यात आली.

धुळे जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाकडे सरकारनं दुर्लक्ष केल्याचा आरोप करत धुळे जिल्हा सकल मराठा समाजानं आज सकाळी ‘जलसमाधी’ आंदोलन केलं. पोलिसांनी हस्तक्षेप करत आंदोलकांना जलसमाधीच्या स्थळी रोखलं.

यावेळी आंदोलकांनी, सरकारनं मराठा आरक्षणाबाबत यापूर्वी दिलेली सर्व आश्वासनं पूर्ण करावीत, तसंच हैदराबाद, सातारा, मुंबई गॅझेटसह आरक्षणाच्या सर्व मागण्यांवर त्वरित ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी हिंगोली जिल्ह्यात मराठा संघटनाच्या वतीने बंद पाळण्यात आला.

<><><><><>

चायना मास्टर्स सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत पुरूषांच्या एकेरी प्रकारात भारताच्या किदांबी श्रीकांतने कॅनडाच्या व्हिक्टर लाईचा २१-१८, २१-१९ असा सरळ गेममध्ये पराभव

करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. श्रीकांतचा पुढचा सामना हाँगकाँगच्या ली चेक यिऊशी होणार आहे. तर महिला एकेरीत तन्वी शर्माला मात्र जपानच्या टोमोका मियाझाकी हिच्याकडून पराभव पत्करावा लागला.

<><><><>

महिला क्रिकेटमध्ये टी-२० आशिया चषक स्पर्धेत आज भारताचा सामना हाँगकाँगविरुद्ध होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार हा सामना रात्री ८ वाजता सुरू होईल. भारताच्या संघानं गेल्या रविवारी थायलंडच्या संघावर ९४ धावांनी मात केली होती. आज जर भारताने हाँगकाँगचा पराभव केला, तर उपांत्य फेरीतलं भारताचं स्थान निश्चित होईल.

<><><><>

अहमदाबादमध्ये येत्या ५ ते ९ सप्टेंबर दरम्यान 'ह्युंदाई वर्ल्ड आर्चरी पॅरा सिरीज' ही तीरंदाजी स्पर्धा आयोजित करण्यात आली असून २० देशांचे १०० पेक्षा जास्त खेळाडू यात सहभागी होणार आहेत. भारतात पहिल्यांदाच ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेच्या २०२६ च्या मालिकेतला हा तिसरा टप्पा असून, बँकॉक आणि चेक प्रजासत्ताकातल्या नोव्हे मेस्टो इथं यापूर्वीचे टप्पे पार पडले. स्पर्धेचा चौथा म्हणजेच अंतिम टप्पा ऑक्टोबर मध्ये ‘चिले’ मधल्या ‘सँटियागो’ इथं होणार आहे.

भारतात गुजरात सरकार, 'स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ गुजरात' आणि 'स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया' च्या सहकार्याने 'आर्चरी असोसिएशन ऑफ इंडिया' ने ही स्पर्धा आयोजित केली आहे.

<><><><>

EOS-05 हा भूनिरीक्षण उपग्रह उद्या प्रक्षेपित केला जाईल, अशी माहिती भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी दिली आहे. श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून उद्या पहाटे २ वाजून ५५ मिनिटांनी GSLV-F17 या रॉकेटवरून या उपग्रहाचं प्रक्षेपण होईल. पृथ्वीला स्वतःभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करायला जितका वेळ लागतो, तेवढ्याच वेळात हा उपग्रह पृथ्वीभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करेल, अशा कक्षेत त्याची स्थापना केली जाईल. या उपग्रहामुळे भूनिरीक्षणाची आपली क्षमता वाढेल, असा विश्वास नारायणन यांनी व्यक्त केला.

<><><><>

गडचिरोली जिल्ह्यात सिरोंचा तालुक्यात आज पहाटे ३ पूर्णांक ६ दशांश तीव्रतेचा भूकंपाचा धक्का जाणवला. भूकंपाचा केंद्रबिंदू सिरोंचा तालुक्यातल्या राखीव वनक्षेत्रात जमिनीखाली १० किलोमीटरवर असल्याची प्राथमिक माहिती आहे. या भूकंपाचे सौम्य धक्के अहेरी तालुक्यात अहेरी आणि नागेपल्ली परिसरातही जाणवली. भूकंपामुळे कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झाली नाही अशी माहिती स्थानिक प्रशासनानं दिली.

**<><><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या बाजार समितीत कांद्याची आवक कमी होऊन कांद्याचा दर ५ हजार ३३० प्रति क्विंटल इतक्या उच्चांकी पातळीवर पोहोचला आहे. गेल्या ४ दिवसांत ठोक बाजारात कांद्याच्या दरात सरासरी ४०० ते ४५० रुपये वाढ झाल्याने किरकोळ बाजारातही कांद्याचे दर वाढायची शक्यता आहे.

**<><><><>**

नवी मुंबई महानगरपालिकेनं वाशीतल्या प्रथम संदर्भ रुग्णालयातल्या ३ कर्मचाऱ्यांना निलंबित केलं आहे. हलगर्जी केल्यानं एका रुग्णाचा मृत्यू झाल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. एका रुग्णाला मुदत संपलेली सलाईन दिल्याचा दावा रुग्णाच्या नातेवाईकांनी केला होता. त्यानंतर त्या रुग्णाला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. तिथं त्याचा मृत्यू झाला.

**<><><><>**

महाराष्ट्र राज्य अन्न आयोगाने भंडारा जिल्ह्यामध्ये दिला जाणारा शालेय पोषण आहार, अंगणवाडीच्या माध्यमातून दिला जाणारा आहार आणि अन्न नागरी पुरवठा विभागामार्फत लाभार्थ्यांना मिळणाऱ्या शिध्याची पाहणी केली. यावेळी आयोगाने जिल्ह्यातल्या शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांना दिला जाणारा आहार अधिकाऱ्यांनी स्वतः खाऊन गुणवत्ता तपासली. आयोगाला तपासणीदरम्यान दोन शाळांच्या स्वयंपाकघरात उंदराच्या लेंड्या आढळल्याने संबधितांवर कारवाईचे आदेश दिले आहेत.

**//<><><><><>//**